Maharashtra State Board of Secondary and Higher SecondaryEducation,
Kolhapur DivisionalBoard, Kolhapur-416004
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - ४१६००४.
Phones : Chairman 2690829 Secretary 2691405 PBX-2696101,2696102,2696103 FAX:[0231]2690758
E-Mail: divsec.kop@gmail.com Web : sscboardkolhapur.in

क्र.कोविमं/डीपी/का.मा./२०२२-२३/382
दिनांक :- 23 MAY 2023

प्रति,
शाळा/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालय,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

विषय: जुन्या व नवीन शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना प्रथम मान्यता देणे,मान्यता वर्धित करणे व कायम मान्यता देणेबाबत.....

सदर परिपत्रकांन्वये सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात येते की,जुन्या व नविन शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना प्रथम मान्यता देणे,मान्यता वर्धित करणे व सांकेतिक क्रमांकास कायम मान्यता देणे यासाठी धोरण निश्चित करणेबाबत दि.०६/०१/२०२३ च्या कार्यकारी परिषदेमध्ये दोन मुद्दे तयार करुन सांकेतिक क्रमांकास कायम मान्यता देण्याच्या एकवट रक्कमेमध्ये वाढ करण्याचे निश्चित झाले आहे.त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | मान्यता वर्धित करणे/कायम मान्यता देणेबाबत कार्यवाही |
|---|---|---|
| १. | नव्याने मान्यता मिळालेल्या व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाची प्रथम मान्यता व कायम मान्यतेसाठी शिफारस असलेल्या तसेच कायम मान्यतेसाठी शिफारस नसलेल्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये. | माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी शिफारस केल्यानंतर अशा शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास मंडळ मान्यता व सांकेतांक क्रमांक देतांना पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी<br>अ) (i) पहिल्या वर्षी इंग्रजी माध्यम शाळेसाठी (इयत्ता १०वी) रु.१०,०००/-<br>(ii) इंग्रजी माध्यम कनिष्ठ महाविद्यालयासाठी (इयत्ता १२वी) रु.१२,०००/-<br>(iii) इतर सर्व माध्यमांच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयासाठी प्रत्येकी रु.१०००/-प्रमाणे शुल्क आकारुन मंडळ मान्यता व सांकेतांक क्रमांक द्यावा. |

| अ. क्र. | तपशील | मान्यता वर्धित करणे/कायम मान्यता देणेबाबत कार्यवाही |
|---|---|---|
| | | ब) तदनंतर सलग ५ वर्ष मान्यता वर्धित करुन प्रति वर्ष रु.१०००/- प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल. |
| | | क) १) शिक्षण उपसंचालक कार्यालयाची प्रथम मान्यता व कायम मान्यता असलेल्या व मंडळ नियमावलीतील सर्व अटी शर्तीची पूर्तता होत असल्यास पुढील वर्षी कायम मान्यता द्यावी व त्यासाठी रु.५०००/- शुल्क आकारण्यात यावे.<br>२) शिक्षण उपसंचालक कार्यालयाची प्रथम मान्यता असलेल्या तथापि कायम मान्यता नसलेल्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना शिक्षण उपसंचालक कार्यालयाची प्रथम मान्यता जो पर्यंत सुरु आहे तो पर्यंत (मान्यता काढून घेईपर्यंत) अशा माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना मंडळ नियमावलीतील सर्व अटी शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून कायम मान्यता देण्यात यावी व त्यासाठी एकवट रु.१५,०००/- शुल्क आकारण्यात यावे. |
| २ | मागील ६ (सहा) वर्षापूर्वी व मागील ६ (सहा) वर्षात मान्यता मिळालेल्या व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाची प्रथम मान्यता व कायम मान्यतेसाठी शिफारस असलेल्या तसेच कायम मान्यतेसाठी शिफारस नसलेल्या माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये | अ) (i) पहिल्या वर्षी इंग्रजी माध्यम शाळेसाठी (इयत्ता १०वी) रु.१०,०००/-<br>(ii) इंग्रजी माध्यम कनिष्ठ महाविद्यालयासाठी (इयत्ता १२वी) रु.१२,०००/-<br>(iii) इतर सर्व माध्यमांच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयासाठी प्रत्येकी रु.१०००/- प्रमाणे शुल्क आकारुन मंडळ मान्यता व सांकेतांक क्रमांक घेतला असल्याने याबाबत पुन्हा कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. |
| | | ब) १) शिक्षण उपसंचालक कार्यालयाची प्रथम मान्यता व कायम मान्यता असलेल्या व मंडळ नियमावलीतील सर्व अटी शर्तीची पूर्तता केल्यास पुढील वर्षापासून सांकेतांक क्रमांकास कायम मान्यता द्यावी व त्यासाठी रु.५०००/-प्रमाणे शुल्क आकारण्यात येईल.<br>२) शिक्षण उपसंचालक कार्यालयाची प्रथम मान्यता असलेल्या तथापि कायम मान्यता नसलेल्या माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना शिक्षण उपसंचालक कार्यालयाची प्रथम मान्यता जो पर्यंत सुरु आहे तो पर्यंत (मान्यता काढून घेईपर्यंत) अशा माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना मंडळ नियमावलीतील सर्व अटी शर्तीची पूर्तता करण्याच्या अधीन राहून कायम मान्यता देण्यात येईल व त्यासाठी एकवट रु.१५०००/- शुल्क आकारण्यात येईल. |

**<u>शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कायम मान्यता देतांना खालीलप्रमाणे कार्यवाही केली जाईल.</u>**

१. सन २०१७-२०१८ पासून पुढे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून मान्यता वर्धित शुल्क आकारुन तक्त्यां मध्ये नमूद केल्याप्रमाणे कायम सांकेतांक मान्यता देण्याची कार्यवाही केली जाईल

२. विभागीय मंडळांना मान्यता वर्धित शुल्क आकारणी करतांना यामध्ये सुलभता असावी व अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून सन २०१७-२०१८ पूर्वीचे शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांकडे प्रलंबित असलेले मान्यता वर्धित शुल्काची आकारणी केली जाणार नाही.

३. औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) यांचेबाबतीत सुध्दा तक्त्यां मधील अ.क्र.१ व २ मध्ये नमूद प्रमाणे मान्यता वर्धित व कायम सांकेतांक मान्यता देण्याची कार्यवाही करावयाची आहे.मात्र सदर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना कायम सांकेतांक मान्यता देतांना संबंधित जिल्ह्याचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांची तसेच सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,प्रादेशिक कार्यालय,घोले रोड,पुणे यांची शिफारस तसेच इन्सपेक्शन रिपोर्ट,मंडळ नियमावलीतील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करण्याच्या अधीन राहून कायम मान्यता देण्याची कार्यवाही केली जाईल.

४. स्वयं अर्थसहायित इंग्रजी माध्यमांच्या शाळा (इ.१० वी) साठी रु.१०,०००/-व कनिष्ठ महाविद्यालय (इ.१२ वी) रु.१२,०००/-प्रमाणे शुल्क आकारुन प्रथम मंडळ मान्यता व सांकेतांक क्रमांक देणेत येईल.इतर सर्व माध्यमांच्या स्वयं अर्थसहायित शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांना प्रत्येकी रु.५०००/- शुल्क आकारुन प्रथम मंडळ मान्यता व सांकेतांक क्रमांक दिला जाईल.

५. स्वयं अर्थसहायित शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांनी दरवर्षी रु.२०००/- शुल्क भरुन मान्यता वर्धित करुन घ्यावी.

६. **स्वयं अर्थसहायित शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांना कायम मंडळ मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येणार नाही.सदर शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी दरवर्षी नूतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील.**

**(डी.एस.पोवार)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.**